# <u>प्रेसनोट</u>

**पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड जा.क्र. 261/2022 दिनांक : 03.07.2022**

## 1)खुनाचा प्रयत्न :–

**मुदखेड :–**दिनांक 01.07.2022 रोजी 18.00 वा. चे सुमारास, **फिर्यादीचे शेतात मौजे पिंपरी ता. मुदखेड जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा त्याचे शेतातील बोअरची मोटार चालु करुन पाईप कुठे निघाला आहे का म्हणुन पाहण्यासाठी यातील आरोपी यांचे शेतातुन जावून पाईप चेक करुन परत शेतात आला असता यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन माझ्या शेतात का आला होतास म्हणुन शिवीगाळ केली व हातातील कत्तीने मानेवर मारीत असताना फिर्यादीने सदरचा घाव हातावर घेतल्याने हाताला गंभीर दुखापत होवून फॅक्चर झाले तसेच पायावर कत्तीने मारुन गंभरी जखमी करुन खुन करण्याचा प्रयत्न केला, साक्षीदार सोडवण्यास आला असता त्याला पण मारहाण केली व जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी व्यंकटी रामजी गाढे, वय 203 वर्षे, व्यवसाय शेती रा. चिलपिंपरी ता. मुदखेड जि. नांदेड** यांचे फिर्यादवरुन **पोस्टे मुदखेड** गुरन 143/2022 कलम 307,326,324,323,504,506,34, भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन तपास **मपोउपनि/एम.ए. यावलीकर, मो. नं. 8379089710** हे करीत आहेत.

## 2)जबरी चोरी :–

**अर्धापुर :–**दिनांक 01.07.2022 रोजी 09.00 वा. चे सुमारास, **जि.प. शाळा समोर मालेगाव ता. अर्धापुर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादी हा मालेगाव येथील दुध डेअरी येथे दुध देण्यासाठी आला होता व दुध देवून परत गावी जात असताना यातील नमुद सोळा आरोपीतांनी संगणमत करुन फिर्यादीस तु आमचे मुलासोबत भांडण का केलास म्हणुन रॉड व लाठी, थापडबुक्याने मारहाण केली व साक्षीदार हे सदरचे भांडण सोडविण्यास आले असता त्यांचे जवळील व्हिओ कंपनीचा मोबाईल किंमती 9000/–रुपयाचा जबरीने चोरुन घेतला तसेच साक्षीदार यांचे दुकानाचे काचावर दगडफेक करुन दुकानाची नासधुस केली, ॲटोची काच फोडुन एकुण 7000/–रुपयाचे नुकसान केले. दुकानाच्या गल्यातील 8400/–रुपये जबरीने चोरुन नेले. वगैरे **फिर्यादी अंकुश गणपती कदम वय 27 वर्षे, व्यवसाय शेती रा. देगाव ता. अर्धापुर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे अर्धापुर** गुरनं 187/2022 कलम 395,427 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोनि/श्री जाधव**, **मो.क्रं. 7798834263** हे करीत आहेत.

## 3)घरफोडी :–

**भोकर :–**दिनांक 30.06.2022 रोजी 01.00 वा. ते दिनांक 01.07.2022 रोजी 05.00 वा. दरम्यान, **फिर्यादीचे राहते घरी दत्तनगर, कृष्ण मंदिर जवळ भोकर ता. भोकर जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीचे राहते घराचे मेनगेटचे मुख्य दाराचे कुलूप तोडून आत प्रवेश करुन घरातील लोखंडी कपाटातील सोन्याचे दागीने व नगदी असा एकुण 84,000/–रूपयाचा ऐवज कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेला. वगैरे **फिर्यादी सतीश दत्तात्रय गंगासागर वय 29 वर्षे, व्यवसाय खाजगी नौकरी रा. दत्तनगर, कृष्ण मंदिर जवळ भोकर ता. भोकर जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे भोकर** गुरनं 241/2022 कलम 457,380 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोह/2090 पांढरे**, **मो.क्रं. 9850733744** हे करीत आहेत.

## 4)मो. सा. चोरी :–

**1)किनवट :–** दिनांक 30.06.2022 रोजी 12.30 वा. सुमारास, **ठाकरे चौक येथील एम.एस.ई.बी. कार्यालयाजवळ गोकुंदा किनवट ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो.सा. क्रं. एम.एच.–26/2815 किमती 20,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी नरसिंग चुडामन राठोड, वय 38 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. पोटादा खु ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे किनवट** गुरनं 134/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री मामीडवार, मो.क्र. 9850061133** हे करीत आहेत.

**2)नांदेड ग्रामीण :–** दिनांक 24.06.2022 रोजी 22.30 वा. ते दिनांक 02.07.2022 रोजी 02.00 वा. चे दरम्यान, **फिर्यादीचे घरासमोरुन हाडको,नांदेड येथे,** यातील फिर्यादीची मो.सा. क्रं. पी.बी.–09/एफ–3961 किमती 20,000/–रुपयाची नमुद ठिकाणावरुन कोणीतरी अज्ञात चोरटयाने चोरुन नेली. वगैरे **फिर्यादी शैलेंद्र रामचंद्र काठकळंबेकर, वय 48 वर्षे, व्यवसाय नौकरी रा. हाडको, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 392/2022 कलम 379 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री शिंदे, मो.क्र. 9511851737** हे करीत आहेत.

## 5)विवाहीतेचा छळ :–

**नांदेड ग्रामीण :–** माहे 10 डिसेंबर 2018 ते मे 2022 पावेतो, **वांगी ता.जि. नांदेड ह.मु. वाजेगाव, नांदेड येथे,** यातील नमुद सहा आरोपीतांनी संगणमत करून फिर्यादीच्या चारित्र्यावर संशय घेवून उपाशी पोटी ठेवून मारहाण करुन शारिरीक व मानसिक छळ केला व घराबाहेर हाकलून दिले व पुन्हा आलीस तर तुकडे करुन नदीत फेकुन टाकतो असे म्हणुन जिवे मारण्याची धमकी दिली. वगैरे **फिर्यादी** 42 **वर्षीय महिला** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरनं 393/2022 कलम 498(अ),323,504,506,34 भादवी कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/616 चक्रधर, मो.क्रं. 7020448411** हे करीत आहेत.

## 6)आत्महत्येस प्रवृत केले :–

**इस्लापुर :–**दिनांक 01.07.2022 रोजी 04.00 वा. चे सुमारास, **मयताचे राहते घरी, बुरकुलवाडी, ता. किनवट जि. नांदेड येथे,** यातील **मयत नामे प्रियंका अविनाश जाधव वय 32 वर्षे, रा. इस्लापुर ता. किनवट जि. नांदेड**, हिस यातील नमुद चार आरोपीतांनी संगणमत करुन शिवीगाळ व मारहाण करुन वारंवार मानसिक छळ केल्याने मयत हिने गळफास घेवून आत्महत्या केली तिचे मरणास यातील नमुद सहा आरोपी जबाबदार आहेत. वगैरे **फिर्यादी वसंत रामु राठोड, वय 52** वर्षे, **व्यवसाय शेती रा. इस्लापुर ता. किनवट जि. नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे इस्लापुर** गुरन 70/2022 कलम 306,498,506,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री बोधगिरे, मो.नं. 9404222624** हे करीत आहेत.

## 7)फसवणुक :–

**नांदेड ग्रामीण :–** दिनांक 01.06.2019 रोजी 15.30 वा. चे सुमारास, **पाकीजा फंक्शन हॉलचे समोर रोडवर, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी संगणमत करुन व्हि.एच. पटेल ॲन्ड कंपनी सुर्य छाप टोटा चे बनावटीकरण करुन कंपनीचे बनावटी लेबल व रेपरचे बनावटी प्रींन्टींग तयार करुन त्यात निकृष्ठ दर्जाचे तंबाखु भरुन सदर माल व्हि.एच. पटेल ॲन्ड कंपनी सुर्य छाप टोटा आहे असे दर्शवुन शासनास मिळत असलेले महसुल बुडवून कंपनीची व शासनाची फसवणुक केली. वगैरे **फिर्यादी सुभाष रामचंद्र बारी, वय 60 वर्षे, व्यवसाय सेल्स मॅनेजर रा. व्यंकटेश नगर,हरी विठ्ठल रोड जळगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे नांदेड ग्रामीण** गुरन 391/2022 कलम 420,465,34 भादवि कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोउपनि/श्री हंबर्डे, मो.नं. 9823040224** हे करीत आहेत.

## 8)जुगार :–

**वजिराबाद :–** दिनांक 02.07.2022 रोजी 15.10 वा. चे सुमारास, **उस्मानशाही शाळेजवळ पंचशीलनगर, नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या मिलन डे नावाचा मटका जुगार खेळत व खेळवित असतांना नगदी 3060/–रुपये व जुगाराचे साहित्यासह मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोना/1098 गजानन दिगांबर किडे, ने. पोस्टे वजिराबाद** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे वजिराबाद** गुरनं 231/2022 कलम 12(अ), म. जु. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असून **तपास पोना/1353 चावरे, मो.क्र. 9970757740** हे करीत आहेत.

## 9)प्रोव्हिबीशन :–

**1)उस्माननगर :–** दिनांक 02.07.2022 रोजी 14.05 वा. चे सुमारास, **उदासिंग बाबा चौक उस्माननगर ता. कंधार जि. नांदेड येथे,** यातील नमुद आरोपीने बिना परवाना बेकायदेशिररित्या विदेशी दारू किंमती 3200/–रुपयाची चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेला मिळुन आला. वगैरे **फिर्यादी पोउपनि/श्री सुनील जयराम पल्लेवाड, ने. पोस्टे उस्माननगर, नांदेड** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे उस्माननगर** गुरनं 129/2022 कलम 65 म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास पोना/2536 राठोड, मो.क्र. 9307343434** हे करीत आहेत.

**2)लिंबगाव :–** दिनांक 02.07.2022 रोजी 17.35 वा. चे सुमारास, **लिंबगाव बसस्थानक जवळ अक्षय कदम यांचे पानपट्टी जवळ ता. जि. नांदेड येथे,** यातील नमुद दोन आरोपीतांनी बिना परवाना बेकायदेशिररित्या देशी दारू भिंगरी संत्रा किंमती 3120/–रुपयाची, टी.व्ही.एस. ज्युपिटर गाडी किंमत 90,000/–रुपयाची सह चोरटी विक्री करण्याचे उद्देशाने ताब्यात बाळगलेले मिळुन आले. वगैरे **फिर्यादी पोका/95 मुंजाजी अशोकराव चौरे, ने. पोस्टे लिंबगाव** यांनी दिलेल्या फिर्यादवरुन **पोस्टे लिंबगाव** गुरनं 111/2022 कलम 65 (ई),83 म. प्रो. कायदा प्रमाणे गुन्हा दाखल असुन **तपास सपोउपनि/श्री जहागीरदार, मो.क्र. 9823971641** हे करीत आहेत.

**जनसंपर्क अधिकारी**
पोलीस अधिक्षक कार्यालय, नांदेड